# <u>आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय</u>

दुसरा मजला, जुने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०० ०२३
E-mail : dycomminspection@gmail.com Tel. No. 22660163.

## <u>परिपत्रक</u>

<u>विषय</u> : किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीमध्ये एक दिवशीय मद्य सेवन परवान्यावरच मद्यविक्री होण्याबाबत कायमस्वरूपी फलक लावणेबाबत.

क्र. एफएलआर ११२००७/एफएलएक्ससी/सात                    मुंबई, दि. २९ जून, २०१६

महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १२ अन्वये मादक द्रव्ये जवळ बाळगणे, विकत घेणे इत्यादीस मनाई केलेली असून कलम ४८ मध्ये मादक द्रव्ये सेवन किंवा बाळगण्याच्या परवान्याबाबत तरतुद आहे. त्याअनुषंगाने मुंबई विदशी मद्य नियमावली, १९५३ च्या नियम ७०(ड) नुसार देशी/विदेशी मद्य खरेदी करणे, जवळ बाळगणे, वाहतुक करणे, वापरणे आणि प्राशन करण्याबाबत परवाना विहीत केला असून तो धारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार नमुना एफएलएक्ससी परवाना विहीत करण्यात आला असून एक वर्ष विधीग्राहय असलेल्या परवान्याकरीता रु. १००/- व आजीवन परवान्याकरीता व रु. १०००/- आकारून परवाना मंजुर करण्याची तरतुद विहीत केली आहे.

विविध कारणास्तव मद्य खरेदी, प्राशन करू इच्छिणाऱ्या व्यक्ती उपरोक्त परवाना धारण करीत नाहीत किंवा धारण करीत असल्या तरी प्रत्यक्ष मद्य खरेदी, वाहतुक इत्यादी वेळी विहीत परवाना जवळ बाळगत नाहीत, असे आढळून आल्याने उपरोक्त नियमावलीच्या नियम ७०(G) चा नव्याने समावेश करून एक दिवशीय मद्य परवान्याची तरतुद नियमात करण्यात आली. देशी मद्य एक दिवशीय परवान्यासाठी रु.२/- व एक दिवशीय विदेशी मद्य परवान्यासाठी रू.५/- आकारून सक्षम अधिकाऱ्यासह विविध परवाना धारकाकडील नोकरनामाधारक एक दिवशीय परवाना मंजुर करून शकतील अशी तरतूद विहीत करण्यात आली आहे.

अलीकडेच काही अनुज्ञप्तीच्या निरीक्षणाचे वेळी असे आढळून आले आहे की, किरकोळ मद्य विक्रेते/ अनुज्ञप्तीधारक मद्य विक्री करतांना संबंधीत ग्राहकांकडे एक वर्षीय अथवा आजिवन परवाना त्यांनी धारण केलेला आहे किंवा नाही याची खातरजमा न करताच मद्य विक्री करतात. सदर बाब टाळण्यासाठीच शासनाने एक दिवशीय परवान्याची तरतुद विहीत केली असून सर्वच कार्यकारी

अधिकाऱ्यांव्दारे सर्व प्रकारच्या किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांना वेळोवेळी व नियमितपणे एक दिवशीय परवान्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे. मात्र प्रत्यक्ष मद्य विक्रीच्या वेळी अनुज्ञप्तीधारकांकडुन सदर परवाना संबंधीताकडे आहे किंवा नाही? ही बाब पाहिली जात नाही. सदर परवाना नसल्यास अनुज्ञप्तीधारकांकडुन ग्राहकांस मद्य सेवन परवाना अदा केला जात नाही. त्यामुळे कायदेशिर तरतुदीचे उल्लंघन होण्याची शक्यता असते. या सर्व बाबी टाळण्यासाठी सर्व किरकोळ मद्यविक्री अबकारी अनुज्ञप्तीधारक व सर्व कार्यकारी अधिकारी यांनी खालील सुचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

१. सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत सर्व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकांना त्यांच्या अनुज्ञप्तीमध्ये सर्वांना विशेषत: ग्राहकांना सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी व मोठया साईजमध्ये दर्शनी भागात पुढील सूचना नमूद असलेला फलक लावण्याबाबतच्या सूचना देऊन त्यांची परिपुर्ण अंमलबजावणी होईल यांची प्रत्यक्ष निरीक्षणावेळी पडताळणी करावी.

## <u>सूचना</u>

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील तरतुदीनुसार मद्य खरेदी करणे, बाळगण्यासाठी विधीग्राहय परवाना धारण करणे आवश्यक आहे. त्यानुसार केवळ परवानाधारकांनाच मद्य विक्री करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. ज्या व्यक्तीकडे विधीग्राहय परवाना नाही अशा व्यक्तींना एक दिवशीय मद्य सेवन परवाना या अनुज्ञप्तीमधून विहीत शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यात येईल.**

**देशीमद्य एक दिवशीय परवाना किंमत रू. २/-**

**विदेशीमद्य एक दिवशीय परवाना किंमत रू. ५/-**

२. सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीधारकांना एक दिवशीय परवाने उपलब्ध करून द्यावेत. तसेच नियमित व मागणीनुसार देशी व विदेशी मद्याचे एक दिवशीय परवान्यांचा पुरवठा होईल याचीही दक्षता घ्यावी.

३. ज्या अनुज्ञप्तीधारकांकडून त्यांच्या नियमित ग्राहकांसाठी एक वर्षीय अथवा अजिवन परवाना मंजूर होण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज व शिफारस प्राप्त होईल. अशा ग्राहकांना तात्काळ एक वर्षीय अथवा आजिवन परवाना मंजुरीसाठी आवश्यक विहीत अर्ज नमुने देखील पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून देण्यात यावेत. परवाना मंजुरीसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची तपासणी सुची देखील अनुज्ञप्तीधारकास उपलब्ध करून द्यावी. अर्जदाराकडुन आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत नमुन्यातील

अर्ज प्राप्त झाल्यास त्यावर तात्काळ निर्णय घेण्यात यावा.

सर्व अधीक्षकांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांची तात्काळ बैठक आयोजित करून, त्यांना उपरोक्त सूचना अवगत करून या परिपत्रकाची प्रत त्यांना पोहोच करून त्याची नोंद आपल्या अभिलेखावर ठेवावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

जे अधिकारी उपरोक्त सुचनांनुसार फलक लावून घेण्याची कार्यवाही करणार नाहीत, नियमितपणे मद्य परवान्यांचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पुरवठा करणार नाहीत किंवा त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये विना परवाना मद्य विक्री होत असल्याची तक्रार एखाद्या कार्यालयास प्राप्त झाल्यास अथवा या विभागाच्या अन्य अधिकाऱ्यांस तसे आढळून आल्यास या परिपत्रकीय निर्देशाचे संबंधीत अधिकाऱ्यांकडून पालन करण्याचे टाळण्यात येत आहे, असे गृहित धरून त्यांच्याविरूध्द तसेच संबंधीत अनुज्ञप्तीधारकांविरुध्द कायदेशिर कारवाई केली जाईल. यांची संबंधीतांनी गंभीरपणे नोंद घ्यावी.

( विजय सिंघल )
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी.
२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
४) या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५) या कार्यालयातील कार्यासन क्र. ५, ७, ९ व १२ ( ५ प्रती )
६) संगणक कक्ष (To publish on website)
७) सर्व किरकोळ मद्यविक्री संघटना.